# मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीतून व्यक्त झालेला गावगाडा

**प्रा.डॉ.बापू जी.घोलप**

**नवगण महाविद्यालय,परळी वै.जि.बीड.**

**gbapug@yahoo.in / ph.7588057695**

ग्रामीण साहित्याचा अभ्यास करताना एका लेखकाचा अभ्यास, एका वाङ्मयप्रकाराचा अभ्यास, तसेच ग्रामीण साहित्याचा भाषिक अभ्यास, प्रादेशिक बोली अभ्यास, त्याचप्रमाणे ग्रामीण वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन, पुनर्लेखन असे विविधांगी अभ्यास दृष्टीकोन समोर येत आहेत; परंतु ग्रामीण साहित्य ज्या 'गावगाडा' पद्धती भोवती केंद्रित झालेले आहे; त्या गावगाडा संस्कृती संबंधाने वाङ्मय अभ्यास झालेला दिसत नाही.मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना लेखकांच्या वर्णनातून गावगाड्याची वेगवेगळी अंगे-उपांगे यातून समोर येतात व गावगाडा पद्धती मराठवाडी भागात कशा स्वरूपात अस्तित्वात होती याची वाङ्मयाधारे कल्पना येते.

मराठवाडा प्रदेशाची व्याप्ती लक्षात घेता आणि इथल्या ग्रामीण वाङ्मयाची उपलब्धता पाहता समग्र मराठवाडी ग्रामीण साहित्याला गवसणी घालणे मोठे काम आहे, तितकेच ते जिकिरीचे आहे; बहुतांश मराठवाडी कादंबरी लेखनातून कृषिसंस्कृती चित्रित झालेली दिसते. लेखकांनी या गावरहाटीचे पारंपरिक चित्र लेखनात स्पष्ट केले आहे. तसेच आधुनिक काळातील परिवर्तनाचे चित्रही रेखाटले आहे. गावकी, आलुतेदारी, बलुतेदारी शिक्षणाच्या चळवळी, बेकारी, दुकानदारी, सहकार क्षेत्र, औद्योगिकीकरणाचे परिणाम, आधुनिकीकरणाच्या संक्रमणात अडकलेली पारंपरिक मानसिकता ह्यांचे चित्रण ग्रामीण कादंबरीच्या आस्थेचा विषय आहे. ग्रामीण लेखकांनी ज्या अनुभवांना साहित्यरूप दिले ते अनुभव वास्तवाला आणि त्यांच्या भोवतीच्या सामाजिक परिस्थितीला अनुसरून असतात. त्यामुळे नकळतपणे त्यातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक इतिहासही उलगडत जात असतो. त्याचा शोध घ्यावयाचा तर समग्र वाङ्मयकृतीचा धांडोळा घ्यावा लागेल.

## मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरी :-

मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात निजामी राजवटीचा विचार करावा लागतो. कारण त्यावेळी शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यात झालेला नव्हता. जे शिक्षण होते तेही उर्दूतून होते.त्यामुळे शेतकऱ्यांच्या दु:खावर लिहिणार कोण? या काळात बी.रघुनाथांसारख्या हिमतीच्या लेखकाने लिहिले आहे. 'ओऽऽ' ही त्यांची १९३६ मध्ये प्रकाशित झालेली कांदंबरी हैदराबाद मुक्तिसंग्रामावर प्रकाश टाकणारी आहे. याशिवाय बी.रघुनाथ यांच्या हिरवे गुलाब (१९४३) बाबू दडके (१९४४), उत्पात (१९४५) म्हणे लढाई संपली (१९४६) जगाला कळलं पाहिजे (१९४९) आडगावचे चौधरी (१९४९) अशा एकूण सात कादबंऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. मराठवाड्याचे ऐतिहासिक व भौगोलिक संदर्भ अगदी गडद स्वरूपात त्यांच्या कादंबऱ्यातून आलेले आहेत. मराठवाड्यातील गावगाड्यावर, सरंजामशाहीच्या अवशेषावर प्रकाश टाकणारी 'आडगावचे चौधरी' ही त्यांची कादंबरी फार बोलकी आहे. अस्सल ग्रामीण वास्तवाचे दर्शन त्यातून होते. मराठवाड्यात नांदलेल्या व गावावर अधिराज्य गाजवलेल्या चार पाच पिढ्यांचा इतिहास 'आडगाव'च्या निमित्ताने साहित्यरुप घेतो. गावोगावची काहीना काही ख्याती असते तसे आडगाव हे लुच्च्यांचं गाव. ह्या कादंबरीतून आडगावचा कारभार समजून घेण्यासारखा आहे. किंबहूना यासारखी कितीतरी खेडी इथल्या सरंजामशाही व्यवस्थेत नांदली, मोडली, बदलली असल्याचे तपशील ग्रामीण साहित्यात आढळतात. प्रत्यक्ष सामाजिक निरिक्षणातून नोंदवण्यात येणारे समाजजीवन व कथा-कादंबऱ्यादी साहित्यातून येणारे समाजजीवन यात काहीसा फरक दिसतो व बरेचसे साम्य दिसते. म्हणूनच साहित्याद्वारे गावगाडा अभ्यासणे हितावह ठरेल.

बीड जिल्ह्याच्या खेड्यापाड्यांचे दर्शन घडविणारे वि.शं.पारगावकर हे महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांच्या

ललाट, वैशाखातील वावटळ, कालचक्र, शेवगा वेडा झाला, पांढरी माती, गोंदण, निगुडा, अंतरिता या कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. ‘कालचक्र’मध्ये त्यांनी एकत्र कुटुंबपद्धतीची नांदवणूक दाखवली आहेत तर ‘शेवगा वेडा झाला’मध्ये प्रेमकथा रंगविली आहे. अंतरिता (१९७१) मध्ये खेड्यातील एका विशिष्ट जीवनपद्धतीत ब्राह्मण, मराठा, महार, मांग, चांभारादी समाजातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विषयावरील ताणतणाव चित्रित केले आहेत.

लक्ष्मीकांत तांबोळी हे सामान्यत: कवी म्हणून परिचित आहेत. तसेच त्यांनी १९७० मध्ये ‘दूर गेलेले घर’ ही धार्मिक संस्थानावर आधारित कादंबरी लिहिली आहे. ‘कृष्णकमळ’ ह्या दुसऱ्या कादंबरीत त्यांनी ब्राह्मण पुरोहित व त्यांची पत्नी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

ग्रामीण लेखकांच्या दुसऱ्या पिढीतील आघाडीचे लेखक रा.रं.बोराडे यांची ‘पाचोळा’ (१९७१) प्रकाशित झाली. शहरीकरणाने ढासळणारा समाज, खेड्यापाड्याचे व्यावसायिक म्हणून त्यांनी उभं केलेलं शिप्याचं करुण नाट्य त्यामध्ये त्यांनी मराठवाडी स्त्रीच्या निवेदनाचा केलेला प्रयोग अत्यंत बांधेसूद आहे. डॉ.वासुदेव मुलाटे यांनी बोराड्यांच्या कादंबऱ्याचे मूल्यमापन करताना म्हटले आहे की, “ते सतत ग्रामीण जीवनातील परिवर्तन टिपण्याचा प्रयत्न करतात. स्वातंत्र्यानंतरच्या पंधरा-वीस वर्षाच्या काळात हळूहळू खेडी बदलू लागली. दळणवळणाची साधने निर्माण झाल्यामुळे खेडी शहरांशी जोडल्या जाऊ लागली. ग्रामीण उद्योग आणि गावचा गावगाडा मोडकळीस येऊ लागला. अशा काळात पारबती आणि गंगाराम या शिंपी कुटुंबाची वाताहत ज्या कारणांमुळे झाली त्याची करूण कहाणी ‘पाचोळा’ या कादंबरीत रेखाटली आहे.”खरोखरच पाचोळ्याच्या लेखनामुळे मराठवाड्याच्या ग्रामीण लेखनाची वाङ्मयविश्वात जोरदार चर्चा झालेली दिसते. याशिवाय बोराडे याच्या ‘सावट’, ‘चारापाणी(१९९०)’, आमदार सौभाग्यवती (१९९८), महानगाव (१९९३), शिका तुम्ही हो शिका, इथं एक गाव होतं (२०००), रहाटपाळणा (१९९६), मरणदारी, नामदार श्रीमती इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. शेतमजूर व अल्पभूधारक कष्टकऱ्यांचे कैवारी म्हणून बोराडेंचा उल्लेख करता येईल. त्यांनी आपली वाङ्मयीन वाटचाल विशिष्ट अशा निष्ठेने व सचोटीने चालू ठेवली आहे. बोराडेंच्या साहित्याचा विविधांगी अभ्यास झाला आहे. होत आहे. परंतु त्यांच्या साहित्यातील गावगाडा, कृषीसंस्कृती यावर भर देणारे विवेचन येथे करता येईल. ‘ग्रामीण साहित्य’ मध्ये ते म्हणतात की, “आज खेड्यातल्या घराच्या भिंती ढासळत आहेत आणि शहरात मजल्यावर मजले चढत आहेत. खेडी ओस पडण्याच्या, उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत आणि शहरं फुगत चालली आहेत. धान्य पिकविणाऱ्याला एस.टी. मध्ये जागा मिळविण्यासाठी धडपडावं लागत आहे आणि धान्याचा व्यापार करणारा ॲम्बिसिडर कारमधून फिरत आहे असं का घडत आहे?” परीवर्तनाच्या ह्या लाटेत वाहावलेला खेडूत त्यांच्या आस्थेचा विषय आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून गाव मोडल्याचे, बिघडल्याचे, पिचल्याचे कितीतरी संदर्भ येतात त्याचा अन्वयार्थ जुळवून पाहणे आवश्यक वाटते.

ना.धो.महानोरांची कविता काल्पनिक वा रोमॅन्टिक होते; मात्र त्यांची ‘गांधारी’ (१९७३) ही कादंबरी एका खेड्यातील धगधगते वास्तव चित्रित करते. रझाकारांपासून ते स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत खेड्याचा प्रवास विलक्षण ताकदीने गांधारी मध्ये उभा केला आहे.

गणेश घांडगे या ग्रामीण कथा लेखकाची सुली (१९७६) ही छोटीशी, किशोरवयीन मुलांच्या प्रेमाची ग्रामीण कादंबरी आहे. मराठवाड्याच्या ग्रामीण कादंबरीत ऐतिहासिकतेला कुणी हात घातल्याचे दिसत नाही. रंगनाथ तिवारी यांनी ‘देवगिरी बिलावल’ आणि ‘बेगमसमरू’ ह्या दोन कादंबऱ्यातून मराठवाड्याच्या इतिहासाला स्पर्श केला आहे. बंकट पाटील यांची मंधान (१९७९) ही गोदाकाठच्या रंगेल पाटलांचे व तमाशातून नाचणाऱ्या कलावंतीनीचे संबंध चित्रित करते. गो.गो.कुलकर्णी यांच्या ‘काहूर’ला हैद्राबाद मुक्ति संग्रामाची पार्श्वभूमी आहे. १९८५ मध्ये त्र्यंबक आसरडोहकर यांची ‘काळी आई’ ही धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर आधारित कादंबरी आलेली आहे. त्याआधी त्यांच्या हऱ्यानाऱ्या, लिडर ह्या दोन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. बाबू बिरादार यांच्या एकूण सहा कादंबऱ्या वाचकांहाती आलेल्या दिसतात. त्यात

मातीखालचे पाय (१९८०) कावड (१९८२) अग्निकाष्ठ, अंत:पुरुष, संभूती (२००४) इ. होत. बाबा भांड यांची 'जरंगा' (१९७८) ही उल्लेखनीय कादंबरी आहे. याशिवाय त्यांची धर्मा, काजोळ, दशक्रिया (१९९५) ह्या कादंबऱ्याही चर्चेचा विषय झाल्या आहेत. 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही वासुदेव मुलाटे यांची सहकार क्षेत्रावर आधारित बहुचर्चित कादंबरी आहे. गणेश आवटे यांनी चकारी (१९८१) व गणगोत ही लघुकादंबरी लिहिली आहे. शेषराव मोहिते ह्यानी शेतकरी जीवनावर कादंबऱ्या लिहिल्या. तसेच भीमराव वाघचौरे यांनी गराडा, रानखळगी मधून शेतीतील बाजारीकरण, शेतीत घुसलेली दुष्टप्रवृत्ती चित्रित केली आहे. गायरान (१९९६) मध्ये राजेश कांबळे यांनी गावपाटील, सरपंचादी धनदांडग्यांचे पितळ उघडे पाडले आहे. कोयता (१९९४) ही सरदार जाधवांची कादंबरी ऊसतोड कामगारांचे दु:ख बोलतं करते. पैजण (१९९६) ह्या बा.बा.कोटंबेंच्या कादंबरीत प्रेमकथा रंगवली असल्याचे दिसते. मराठवाड्यातील स्त्री कादंबरीकारांमध्ये मथु सावंत यांच्या राहूकेतू (१९९९) जिनगानी (२०००), डॉ.शांता जोशी यांच्या भावकीचा गाव (१९९९) गव्हाणी (२०००) या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. प्रकाश देशपांडे केजकर यांनी एकाची गोष्ट (१९९१) बारदाना (२००४) ढाळज (२००६) या कादंबऱ्या लिहिल्या तर डॉ.जनार्दन वाघमारे यांची 'बखर एका खेड्याची' ही कादंबरी सामाजिक निरीक्षण, सर्वेक्षणाचा ललित आविष्कार ठरते. गढी (२००७) मध्ये गोविंद देशपांडे यांनी खानदानी वतनदार जमीनदारांच्या ऱ्हासाची गोष्ट सांगितली आहे.

मराठवाड्यातून १९८० नंतरच्या दशकात विपुल प्रमाणात कादंबऱ्या पुढे येताना दिसतात. उपरोक्त कादंबरी लेखनातील ग्रामीण समाजचित्रण पाहिले तर त्यात प्रत्येकाच्या अनुभवांची साठवण दिसते. निरीक्षण व मराठवाड्यातला आपआपला प्रदेश ते तपशीलांसह मांडतात. शेती, शेतकरी, गावासंबंधी ह्या लेखकांची दृष्टी गंभीर दिसते. क्वचितच मनोरंजनाची वा शृंगाराची खुमखुमी आलेली दिसते.

## ग्रामीण कादंबरीतील गावगाडा :-

ग्रामीण साहित्याने कोणताही वर्ण्य विषय घेऊन वाङ्मयकृती घडवायची ठरविली तरी ती अल्प स्वल्प अंशाने तरी गावगाड्याच्या व्यापक यंत्रणेला स्पर्शून जाणारी असते. कारण गावगाडा ही स्वंयपूर्ण ग्रामव्यवस्थेची सर्वव्यापी संकल्पना आहे. मुळात 'गाव' वसले. अस्तित्वात येऊ लागले तसतसे त्यांच्या परस्परांत देवाण-घेवाणादी आंतरक्रिया घडू लागल्या व या सर्व दिनक्रमाला गावगाडा असे संबोधले जाऊ लागले. 'गावगाडा' व्यवस्थेचा मूलगामी अभ्यास करण्याचे आद्य श्रेय त्रिंबक नारायण अत्रे यांना द्यावे लागते. 'गावगाडा' ह्या ग्रंथात त्यानी गावगाडा व्यवस्थेसंबंधाने लिहिले आहे. यावरून असे दिसते की गाव वसवीताना तिथे पिकावू जमीन पाहून प्रथम शेतकरी आलेला आहे. त्याच्यासोबत शेतमजूर आले आणि त्यांनी शेतालगतच सुरक्षित जागी वस्ती मांडली. ते राहू लागले. वस्तीची वाडी झाली. ती वाढल्यावर तिला गावाचा आकार आला. खेडे हे खेडव्यांची म्हणजे कष्टणाऱ्यांची वसाहत असते. खेडेगाव असाही शब्द व्यवहारात वापरतात. गावात कष्टणारे म्हणजे शेती करणारे कमी प्रमाणात झाले व व्यापार, उद्योग इत्यादी दुय्यम उदरनिर्वाह साधने वाढली तर त्या गावाचे हळूहळू शहरात रूपांतर होताना दिसते.

आजच्या खेड्याच्या विस्थापनेत त्याच प्रमाणे शहरात उपनगरे वसताना, प्लॉटींग होताना, कॉलनी, अपार्टमेंट बुकींग होताना ग्रामरचनेतील आणि गावगाड्यातील जातीव्यवस्थेतील अंतर ठेवून वागण्यातला पिळ लक्षात घेतला जातो. जाती-धर्मानुसार आजच्या नव्या वसाहतीही उभ्या राहत आहेत. गावगाड्यामध्ये जातिव्यवस्थेला फार महत्त्व होते असे दिसते. भास्कर चंदनशिव यांनी 'नवी वारूळं' मध्ये आजच्या जमान्यात धरणामुळे गावाचे पुनर्वसन होताना गावकऱ्यात जाती-पातीचा व अस्पृश्यतेचा पीळ कसा रहातो याचे वर्णन केले आहे. नव्याने गावाचे पुनर्वसन होताना जुना व्रण मनात कायम असलेला दिसतो. सरकारी हुकूम अस्पृश्यता, जातीयता मोडण्यासाठी सरमिसळ वस्ती मांडू इच्छतो; पण पारंपरिक मानसिकता गावगाड्याचे चित्र बदलून द्यायला तयार नाही असे येथे दिसते. गावगाड्यात एकसंघताही असते. तसेच एक दुसऱ्याचे खाजगी तपशीलवार सारे ठाऊक असते. शहराची रीत याहून फारच निराळी

असते. खेड्यातील वास्तुरचना शैली वेगळी असते. त्यांचे बांधकाम साहित्य स्थानिक परिसरातून मिळालेले असते. जसे चुना, भेंडे, दगड-गोटे, मुरुम, डबर, लाकुड-फाटा वगैरे.

मराठवाडी गावगाडा वसताना तो काळी आणि पांढरी असा स्थूल स्वरूपात विभागण्यायोग्य वसलेला दिसतो. गावगाडा ही गावाची आणि रानाची दोघांची एकत्रित नांदणूक होणारी व्यवस्था होती. ती एकसंघ होती. गावाचे आणि त्याच्या शिवारातील वहिती शेतीचे क्षेत्र कमी होते. जंगलभाग, रस्त्यांचा अभाव, संपर्काचा अभाव दळणवळणाची मंदगती व सीमीत साधने, नात्यागोत्यांचा गोतावळा अशी पारंपरिक गावगाडा रचनेची वैशिष्ट्यपूर्ण चित्रे ग्रामीण कादंबरीत आढळतात. ते स्वाभाविक वा अनपेक्षितपणे आलेले असले तरी समाजव्यवस्थेचे प्रतिबिंब त्यातून प्रकट होताना दिसते.

**सारांश :-**

मराठवाडा प्रदेशाला इथल्या इतिहास भूगोलाचे सखोल असे संदर्भ आहेत. त्याची ओळख असल्याशिवाय साहित्याची जडण-घडण, वृद्धी कशी झाली हे लक्षात येणार नाही. मराठवाडा प्रदेशाची आखणी, मांडणी बरीच जुनी आहे. १८७० साली 'मराठवाडा' हा शब्दप्रयोग प्रथम केल्याचे हैद्राबाद संस्थानातील कागदपत्रावरून दिसते. पण त्यानंतर जवळजवळ शंभर वर्षानंतर खऱ्या अर्थाने मराठवाड्याला स्वातंत्र्य, शिक्षण, सुधारणा ह्यांचा परिचय होऊ लागला. असे असले तरी प्राचीन मराठी वाङ्मयाची जडणघडण समृद्धपणे इथे झाली. नंतर मात्र निजामी राजवटीत तिची गळचेपी झालेली दिसते. मराठी वाङ्मय विश्वात मराठवाड्याचे प्रतिभावंत चमकले पण त्यांचे भरणपोषण निजामाच्या १५० वर्षाच्या राजवटीत उत्तम झाले असते तर आज महाराष्ट्र संस्कृतीचे व मराठी वाङ्मयाचे माहेरघर म्हणून मराठवाड्याकडे पाहिले गेले असते. मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीने १९६० नंतरच्या ग्रामीण प्रवाहात मोलाची भर घातलेली आहे. किंबहुना कथा, कविता, ललितगद्य, समीक्षा लेखनातील काही अग्रणी लेखक ग्रामीण साहित्य प्रवाहाचे नेतृत्व करीत आहेत. महाराष्ट्रातील नवोदित ग्रामीण लेखकांचे पालकत्व स्वीकारून त्यांना मार्गदर्शन करीत आहेत.

मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीचे विहंगमावलोकन केले असता त्यातील काही लेखक गावगाड्याविषयी विशेष रुची दाखवताना दिसतात. काही कलाकृती ग्रामसंस्कृती, कृषिपरंपरा सोबतच गावगाडा व्यवस्थेचे चित्रदर्शी वर्णन करताना दिसतात.

**संदर्भ ग्रंथ**


१.मराठवाड्याचा इतिहास :- डॉ.पी.व्ही. काटे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद-०१
२.मराठवाड्यातील साहित्य :- संपा.डॉ.लुलेकर,डॉ.बडवे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद-०१
३.ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास :- संपा.चंद्रकुमार नलगे, सुरेश एजन्सी, पुणे-०२
४.साहित्यरुप :- डॉ.दादा गोरे, प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०
५.ग्रामीण साहित्य :- रा.रं.बोराडे, साकेत प्रकाशन प्रा.लि., गांधीनगर, औरंगाबाद-०५
६.गावगाडा :- त्रिंबक नारायण अत्रे, वरदा बुक्स, पुणे-१६
७.पंचधारांचा प्रदेश :- डॉ.प्रल्हाद जी.लुलेकर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद-०१



**प्रा.डॉ.बापू जी.घोलप**

**नवगण महाविद्यालय,परळी वै.जि.बीड.**

**gbapug@yahoo.in / ph.7588057695**